# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृह

**मा. स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी दि. ०४/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित विशेष स्थायी समिती बैठकीचे इतिवृत्त.**

मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांचेकडील पत्र क्र.नपप्र/कार्या-२/समिती पिठासीन अधिकारी/२०२५-२६/२८७६, दि. २४/०२/२०२६ अन्वये, मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभापती या पदावर निवड करणेसाठी श्री. सौरभ कटियार, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी बोलाविण्यात आलेली आजची विशेष बैठक सकाळी ११.०० वाजता श्री. सौरभ कटियार, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली. सदर सभेस खालील स्थायी समिती सदस्य उपस्थित होते. उपस्थित सदस्यांची ओळख व खात्री महापालिका सचिव श्री. दिनेश कैलास कानगुडे यांनी केली.

उपस्थित सदस्य :-

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री. हसमुख मोहनलाल गेहलोत |
| २ | श्री. पंकज सुर्यमणी पांडेय |
| ३ | श्री. दिपक कल्याणराव सावंत |
| ४ | श्री. विशाल जगन्नाथ पाटील |
| ५ | श्री. संजय अनंत थेराडे |
| ६ | श्री. आनंद दत्ताराम मांजरेकर |
| ७ | श्रीम. वंदना संजय भावसार |
| ८ | श्रीम. हेतल रतीलाल परमार |
| ९ | श्री. मनोज रामनारायण दुबे |
| १० | श्री. गणेश गोपाळ शेट्टी |
| ११ | श्री. अनिल रवजीभाई विराणी |
| १२ | श्री. नविन गुप्तेश्वर सिंग |
| १३ | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंग |
| १४ | श्री. अनिल दिवाकर सावंत |
| १५ | श्रीम. शर्मिला विन्सन बगाजी |
| १६ | श्री. जय राजेंद्र ठाकूर |

गैरहजर सदस्य :- निरंक

सर्वप्रथम महापालिका सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व विशेष बैठकीचे प्रयोजन व या निवडीची प्रक्रिया उपस्थितांना समजावून सांगितली व विषयपत्रिकेवरील विषयाचे वाचन केले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती, स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

निर्धारित कार्यक्रमानुसार बुधवार दिनांक ०२/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी महापालिका सचिव यांचेकडे प्राप्त झालेले दोन उमेदवारांची दोन नामनिर्देशन पत्र पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी महापालिका सचिव यांनी मा. पिठासीन अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०२ वाजता सादर केली. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. अनिल दिवाकर सावंत | श्री. जय राजेंद्र ठाकुर | श्रीम. शर्मिला विन्सन बगाजी |
| २ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | श्री. थेराडे संजय अनंत | श्री. अनिल रवजीभाई विराणी |

तद्नंतर मा. पिठासीन अधिकारी यांनी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र उपस्थितांसमोर वाचून दाखवले. मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ५(२) नुसार नामनिर्देशन पत्राच्या छाननीचे काम सकाळी ११.०३ वाजता सुरु झाले.

१. पहिले नामनिर्देशन पत्र श्री. अनिल दिवाकर सावंत यांचे आहे. सर्वप्रथम श्री. अनिल दिवाकर सावंत यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्री. अनिल दिवाकर सावंत यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. जय राजेंद्र ठाकुर यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्रीम. शर्मिला विन्सन बगाजी यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. दिनेश कैलास कानगुडे यांच्यामार्फत करण्यात आली. छाननीअंती श्री. अनिल दिवाकर सावंत यांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरविणेत आले.

२. दुसरे नामनिर्देशन पत्र श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल यांचे आहे. श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून स्थायी सामिती सदस्य श्री. थेराडे संजय अनंत यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्री. अनिल रवजीभाई विराणी यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्षऱ्यांची खात्री महापालिका सचिव श्री. दिनेश कैलास कानगुडे यांच्यामार्फत करण्यात आली. छाननीअंती श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

वरीलप्रमाणे दोन उमेदवारांचे दोनही अर्ज वैध करण्यात आले. छाननी अंती वैध उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | श्री. अनिल दिवाकर सावंत |
| २ | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल |

अशा प्रकारे छाननीचे काम सकाळी ११.०३ मि. सुरु करुन सकाळी ११.०७ मिनीटांनी संपविण्यात आले. त्यानंतर पीठासीन अधिकारी यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ५(३) अन्वये ज्या कोणत्या

उमेदवारास आपले नामनिर्देशन पत्र मागे घ्यावयाचे असेल त्यांनी सकाळी ११.०८ ते सकाळी ११.२३ या १५ मिनिटाच्या कालावधीत लेखी नोटीस देवून नामनिर्देशन पत्र मागे घेता येईल असे जाहिर केले.

दिलेल्या मुदतीमध्ये उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली नाही. त्यामुळे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात राहिलेले आहेत.

उमेदवार दोन शिल्लक असल्याने नियम ६(२) प्रमाणे उमेदवाराची नावे वर्णानुक्रमे लावणे आवश्यक असुन, वर्णानुक्रमे अंमित नावे पुढीलप्रमाणे आहेत.

१) श्री. अनिल दिवाकर सावंत

२) श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल

" सभापती " पदाच्या निवडणुकीसाठी दोन उमेदवार शिल्लक राहिले आहेत. सभापती पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन शिल्लक राहिल्याने नियम ६(३) प्रमाणे "हात वर" करुन मतदान घेण्यात येत आहे. प्रथम उमेदवार श्री. अनिल दिवाकर सावंत यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे त्यांनी हात वर करुन व स्वाक्षरी करुन आपले मत नोंदवावे, असे पिठासीन अधिकारी यांनी सांगितले. तेव्हा श्री. अनिल दिवाकर सावंत यांना खालील सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले.

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री. अनिल दिवाकर सावंत |
| २ | श्रीम. शर्मिला विन्सन बगाजी |
| ३ | श्री. जय राजेंद्र ठाकूर |

दुसरे उमेदवार श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल यांना ज्यांना मत द्यावयाचे आहे त्यांनी हात वर करुन व स्वाक्षरी करुन आपले मत नोंदवावे, असे पिठासीन अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल यांना खालील सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले.

| अ.क्र. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | श्री. हसमुख मोहनलाल गेहलोत |
| २ | श्री. पंकज सुर्यमणी पांडेय |
| ३ | श्री. दिपक कल्याणराव सावंत |
| ४ | श्री. विशाल जगन्नाथ पाटील |
| ५ | श्री. संजय अनंत थेराडे |
| ६ | श्री. आनंद दत्ताराम मांजरेकर |
| ७ | श्रीम. वंदना संजय भावसार |
| ८ | श्रीम. हेतल रतीलाल परमार |
| ९ | श्री. मनोज रामनारायण दुबे |
| १० | श्री. गणेश गोपाळ शेट्टी |
| ११ | श्री. अनिल रवजीभाई विराणी |
| १२ | श्री. नविन गुप्तेश्वर सिंग |
| १३ | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंग |

हात वर करुन मतदान घेतले असता १) श्री. अनिल दिवाकर सावंत यांना ०३ इतकी मते व २) श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल १३ इतकी मते मिळाली. तसेच ०० सदस्य तटस्थ राहिले.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल यांना मिळाल्याने ते सभापती, स्थायी समिती पदी बहुमताने निवडून आल्याचे नियम ६(७) अन्वये पिठासीन अधिकारी यांनी घोषीत केले.

निवडणूकीबाबत सर्व अभिलेख महापालिका सचिव, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सादर करण्यात आला. अभिलेख्यांच्या प्रमाणित प्रतींची मागणी केल्यावर त्या संबंधितांना देण्याबाबत महापालिका सचिवांना निर्देश देण्यात आले. सभेच्या पूर्ण कामकाजाचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले. तद्नंतर उपस्थितांचे आभार मानून विशेष बैठकीचे कामाकाज सकाळी ११.२६ वाजता संपल्याचे जाहिर केले.

**दिनांक :- ०४/०३/२०२६**
**स्थान :- मुख्य कार्यालय, स्व. इंदिरागांधी भवन,**
**दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री**
**सभागृह, मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(सौरभ कटियार,** भा.प्र.से.)
**पिठासीन अधिकारी तथा**
**जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर**
**स्थायी समिती सभापती निवडणूक २०२६**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**